# प्रेमाच्या दिशेने . . .

## ~ गुरुमाई चिद्विलासानंद

प्रेमाच्या दिशेने . . .

अशाच रीतीने तुम्ही अंतरी स्थिर राहू शकाल आणि शालीनतेने जीवनात गतिमान होऊ शकाल. जो मार्ग मागे पडला आहे तो कदाचित स्पष्ट राहिला असेल किंवा अस्पष्ट राहिला असेल. आणि कदाचित भविष्यातही असेच राहील. तुमच्या मार्गाकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोण या रंगाने रंगलेला असतो की, तुम्ही त्याचा सामना कशा प्रकारे करत आहात वा कशा प्रकारे करत नाही—मग तो मार्ग चढणीचा दिसत असो किंवा उताराचा, तो सरळ दिसत असो किंवा वाकडातिकडा, तुमचे गंतव्यस्थान जवळ वाटत असो किंवा खूप, खूप दूर. पण तुमचा मूलभूत विश्वास आधीपासूनच असा राहिला नाही का की, "प्रेम आहे"? असे जर असेल, तर हा संकल्प धारण करा, "मला प्रेमाच्या दिशेने पुढे जात राहिलेच पाहिजे जेणेकरून मी स्वतःसाठी आणि इतरांसाठी प्रेमाची ज्योत सदैव प्रखरतेने झगमगत ठेवू शकेन." तुमच्या अंतरी या बीजाचे रोपण करा : *प्रेम अविनाशी आहे.*

~ गुरुमाई

© २०२४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.